# <u>वार्तापत्र</u>

कार्यालय पोलीस अधीक्षक,
गडचिरोली दि. २३/०३/२०१८

आज रोजी उपविभाग अहेरी अंतर्गत येणाऱ्या पोस्टे पेरमिली हद्दीतील पेरमिली ते आलापल्ली रोडवर ३ किमी अंतरावर आरेंदा फाटा येथे नक्षलवादयांनी २३ मार्च ते २९ मार्च दरम्यान बंदी छोडो सप्ताह साजरा करण्याबाबत लावलेले ३ बॅनर मौजा आरंदा येथील ग्रामस्थांनी उत्स्फुर्तपणे एकत्र येवून नक्षलवादयांचा विरोध करत जाळले. यादरम्यान गावकऱ्यांनी माओवादयांचा निषेध करत आपण माओवादयांच्या विरोधात असल्याचे सांगितले माओवादी आपल्या भागातील विकास कामांना आडकाठी आणत आपली प्रगती होवू देत नसल्याचे आमच्या लक्षात आल्याने येथून पुढे माओवादयांना कसल्याही प्रकारची मदत न करण्याची शपथ उपस्थित ५० ते १०० गावकऱ्यांनी घेतली.

५० वर्षापासून आपणच आदिवासी समाजातील लोकांच्या विकासासाठी झटत आहोत. असे भासवून आपलाच फायदा पाहणाऱ्या आणि गरीब आदिवासी जनतेची आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक प्रगतीत आडकाठी बनुन विकासास बाधक ठरणाऱ्या नक्षलवादयांच्या विरोधात जात व प्रशासनाला साथ देण्याचे ठरवून गडचिरोली जिल्हयातील आरंदा गावाने सर्वांसमोर उत्तम उदाहरण ठेवले आहे. आठवडाभरापुर्वीच उपविभाग भामरागड हद्दीतील ४ गावातील २०० ते २५० गावकऱ्यांनी एकत्र येत अशाचप्रकारे निषेध नोंदवत नक्षलींना बांधलेले नक्षल स्मारक उध्वस्त केले होते.

या दोन्ही घटनांवरून माओवादयांच्या दुटप्पीपणाला दुर्गम भागातील गरीब आदिवासी लोकांनी ओळखले असून आता या लोकांनीच त्यांच्याविरोधात जाहिरपणे निषेध नोंदविणे सुरू केल्याचे दिसून येते.



